महाराष्ट्र शासन

# Government Medical College & Hospital, Nandurbar
## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नंदुरबार.

पत्ता : जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, साक्री रोड, नंदुरबार- 425412.
Website -htpp://gmchnandurbar.com E-Mail:- deangmchnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.शावैमरुनं/मज्योजाआयो/जाहिरात/3133/२०२४ दिनांक:-19 /०७/२०२४

**विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नंदुरबार येथे डाटा एंटी ऑपरेटर पद रुग्णसेवेच्या दृष्टीने भरणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे निव्वळ तात्पुरत्या कंत्राटी तत्वावर स्थानिक निवड समिती मार्फत थेट मुलाखतीव्दारे (Walk in Interview) भरण्यासाठी गुणवत्ता यादी तयार करावयाची आहे.**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नंदुरबार येथे रुग्णसेवेच्या दृष्टीने रुग्ण नोंदणी विभागात महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजने अंतर्गत ११ महिन्यांकरिता डाटा एंटी ऑपरेटर पद कंत्राटी पध्दतीवर १पदे भरणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे स्थानिक निवड समिती मार्फत थेट मुलाखतीव्दारे (Walk in Interview) भरण्यासाठी पदभरती करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम तारिख२९/०७/२०२४ वेळ: सायंकाळी ५.०० वाजेपर्यत. सदर वेळेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

### " जाहिरात "
### कंत्राटी डाटा एंटी ऑपरेटर

**अर्ज सादर करण्याबाबत:-** विहित नमुन्यातील अर्ज प्रत्यक्ष येवुन योग्य त-हेने भरलेले अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतीसह अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावेत.

**शैक्षणिक अर्हता :-** ०१.कोणत्याही शाखेतील पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रक व पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र
०२.टंकलेखन (मराठी-३०,इंग्रजी ३०/४०) उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र
०३.संगणक परिक्षा (एमएससीआयटी) उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र
०४. १० वी व १२ वी माध्यमिक व उच्च माध्यामिक शालांत परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र शाळा सोडल्याचा दाखला/प्रमाणपत्र
०५ रहिवासी प्रमाणपत्र/आदीवास प्रमाणपत्र. ०६.शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थेत काम केल्याचे प्रमाणपत्र.

- उमेदवारांनी सर्व शैक्षणिक कागदपत्रे साक्षांकीत करणे आवश्यक आहे. सदरील पदासाठी वयोमर्यादा व इतर अटी शर्ती महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णया प्रमाणे लागू राहील.

**वेतन:-** महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजनेअंतर्गतमंजुर असलेल्या अनुदानामधुन सदर खर्च करण्यात येईल. सदर पदाचे मासिक एकत्रित वेतन रुपये १०,०००/-असे राहील.

**निवड :-** शासकीय/निमशासकी/खाजगी संस्थेत काम केलेले असल्यास प्रथम प्राधान्य राहील. प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार विहीत निकषठरवून शैक्षणिक कागदपत्रे छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलवण्यात येईल. मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. मुलाखतीकरिता निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी दिनांक३०/०७/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नंदुरबार यांचे नोटीसबोर्डवर लावण्यात येईल.निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची मुलाखत घेवून उत्तीर्ण उमेदवारांची गुणानुक्रमे निवड/प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारास ११ महिन्यांकरिता नियुक्ती देण्यात येईल काम समाधानकारक असल्यानंतरच कालावधी वाढविण्यात येईल.

**जाहिरातीमधील मजकुरात बदल करण्याबाबत :-** सदर जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात बदल करण्याबाबत उदा. अटी/नियम /निवड/पद भरणे अथवा रद्य करणे/नियुक्ती कालावधी वाढविणे अथवा कमी करणे/पदसंख्या/जाहिरात रद्य करणे व अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवण्यात आले आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय, नंदुरबार

प्रति,
१.सुचना फलक , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णाल, नंदुरबार
२.वैद्यकीय समन्वयक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नंदुरबार